Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.म./परीक्षा-७/६७११
पुणे - ४११००४
दिनांक -१२/१२/२०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:–शास्त्रीय कला,(गायन,वादन,नृत्य),चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या तसेच खेळाडू ,एन.सी.सी.,स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांना छाननीशुल्क आकारणी करणेबाबत.

संदर्भ :–क.रा.मं./परीक्षा–७/६४८७/दि.२८.११.२०२२

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी ) शास्त्रीय कला(गायन,वादन,नृत्य) ,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला तसेच खेळाडू,एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यासाठीचे प्रस्ताव शाळांकडून तसेच शिक्षणाधिकारी/जिल्हा कीडा अधिका–यांकडून विभागीय मंडळांना प्राप्त होतात.

सदर प्रस्तावांची छाननी करणेकरिता फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रती विद्यार्थी रू.५०/– (रू.पन्नास फक्त) छाननी शुल्क म्हणून शाळां/कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रस्ताव सादर करत असतानाच चलनाव्दारे किंवा रोख रक्कम भरणा करूनच विभागीय मंडळस्तरावर प्रस्ताव स्विकारणेत यावेत असा ठराव कार्यकारी परिषदेत पारीत केलेला होता त्या अनुषंगाने संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या संदर्भात वेगवेगळया संघटनांच्याकडून निवेदने प्राप्त झाली होती. सदर निवेदनांचा विचार करून व विद्यार्थी हित लक्षात घेवून शास्त्रीय कला,चित्रकला,लोककला तसेच खेळाडू ,एन.सी.सी., स्काऊट व गाईड प्रकाराच्या प्रस्तावांच्या छाननीसाठी प्रती विद्यार्थी रू.५०/–(रू.पंनास फक्त ) ऐवजी प्रती विद्यार्थी रू.२५/–(रू.पंचवीस फक्त ) छाननी शुल्क म्हणून शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रस्ताव स्विकारत असतानाच विभागीय मंडळाच्या नावे चलनाव्दारे किंवा रोखीने भरणा करून स्विकारावेत. सदर कार्यवाही मार्च–२०२३ च्या परीक्षेपासून अमलात आणावी. शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी कीडा प्रस्ताव जिल्हा कीडा अधिकारी यांच्याकडे सादर करत असतानांच विभागीय मंडळाच्या नावे रक्कम भरणा केलेल्या बँक चलनाची प्रत जोडूनच प्रस्ताव सादर करावेत. सदरचा सुधारीत बदल विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ,पुणे

---

क्र.मुंविमं/उमाप/ १३५१८
वाशी नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक-१३.१२.२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय कार्यक्षेत्रातील
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ट महाविद्यालये,
मुंबई /बृहन्मुंबई / ठाणे / पालघर /रायगड जिल्हे.

उपरोक्त पत्रानुसार मुख्याध्यापक / प्राचार्यांनी आपल्या स्तरावर नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

(डॉ.सुभाष बोरसे )
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी नवी मुंबई- ४०० ७०३

प्रत यांना त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१ मा.शिक्षण उपसंचालक,मुंबई.
२ शिक्षणाधिकारी (माध्य.) मुंबई / ठाणे /रायगड .
३ शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई विभाग ( पश्चिम/दक्षिण/उत्तर ).
४प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार/डहाणू/शहापूर/पेण/पालघर.
प्रत माहितीस्तव :- मा.सचिव, राज्यमंडळ,पुणे

Scanned with OKEN Scanner